# स्त्री भृणहत्या आणि स्त्री पुरुष प्रमाणात असमानता

## (स्वरुप, कारणे, परिणाम, उपाययोजना)

**डॉ. चंद्रशेखर गित्ते**
लोकप्रशासन विभाग
महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर

---

*सारांश :—*

*नोबेल पुरस्कार प्राप्त डॉ. अमर्त्य सेन यांनी 'हरविलेल्या स्त्रियांची' संकल्पना मांडली व त्यातुन स्त्री पुरुष प्रमाणातील असमानतेचे भयानक वास्तव सगळ्या जगासमोर आले. गेल्या शतकातील जनगणनेचे लिंग अनुपाताचे आकडे बघितल्या नंतर स्त्रीयांच घटते प्रमाण ही गांभीर्याने पाहिल्यानंतर 1970 नंतरचे वैद्यकीय क्षेत्रातील गर्भपूर्व चाचणीच्या आधुनिक तंत्राचा दुरुपयोग होऊन स्त्री गर्भपाताचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले. 2001 च्या जनगणेनुसार धेक्याची पातळी गाठल्याने* **PC & PNDT Act** *2002 हा अधिकच कडक करण्यात आला पण या कायदेशीर तरतुदीबरोबरच स्त्री पुरुषांमधील, आरोग्य विषयक, शिक्षण विषयक, रोजगार प्राप्तीच्या संधीबाबतची विषमता कमी केल्यास व स्त्रियांच्या बाबतीत सामाजिक दृष्टीकोन सकारात्मक घडवून आणल्यास खऱ्या अर्थाने संतुलित सामाजिक संरचना अस्तित्वात येईल. व अशी समाज रचना भावी विकासचा पाया निश्चितपणे भक्कम करु शकते. ही बाब आता नागरिक पातळीवर सुध्दा मान्य झाल्याचे दिसते. गेल्या काही दशकात 'महिला विकास' ही संकल्पना केन्द्रस्थानी आली असून केन्द्र व राज्य सरकारांनी महिलांना मुख्य प्रवाह सामिल करुन घेण्यासाठी खास धोरणे व महिला विकास योजना आखल्या आहेत.*

---

प्रस्तावना :—

संपूर्ण जगातील मानवी समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या विविध प्रकारच्या विषमतांचा विचार करतांना प्रामुख्याने जाणवणारी विषमता म्हणजे लिंगाधारित किंवा स्त्री पुरुष प्रमाणातील विषमता होय. ही विषमता विविध प्रकारची आहे आणि तिची रुपेही अनेक आहेत. अती पाशवी पातळीवर ही विषमता मृत्यूदर वाढीमध्ये परावर्तित होते आणि ती समाजातील स्त्री पुरुष प्रमाणावर परिणाम करते. वास्तविकतेत जर स्त्रियांना समान आरोग्य, सुविधा आणि पोषण दिले गेले तर स्त्रियांमध्ये वयानुसार मृत्यूदर पुरुषांपेक्षा कमी असतो, स्त्री गर्भाचे पुरुष गर्भापेक्षा नैसर्गिक गर्भपाताचे प्रमाणही कमी असल्याचे आढळून येते. असे असूनही आरोग्य, सुविधा आणि सामाजिक काळजी यातील पक्षपातामुळे स्त्रियांचा मृत्युदर हा पुरुषांच्या मृत्यूदरापेक्ष पुष्कळ जास्त असल्याचेच आढळून येते.

नोबल पुरस्कार प्राप्त डॉ. अमर्त्य सेन यांनी 'हरविलेल्या स्त्रियांची' (Missing Women) संकल्पना मांडतांना असे प्रतिपादन केले की, फक्त एका वर्षात संपूर्ण जगातून जवळजवळ 10 कोटींपेक्षा अधिक स्त्रिया हरविल्या गेल्या आहेत. आरोग्य आणि मृत्यूदर या संदर्भातील स्त्री विरोधी विचारांमुळे संपूर्ण जगाला केवढी मोठी शिक्षा भोगावी लागत आहे याचे भयानक वास्तव 'हरविलेल्या स्त्रियांची संख्या' यातुन समोर आले भारतात या संदर्भात काय वास्तव चित्रण आहे ते शोधण्यासाठी 'स्त्री भ्रुणहत्या आणि स्त्री पुरुष प्रमाणात असमानता (स्वरुप, कारणे, परिणाम, उपाययोजना)' या विषयावर प्रस्तुत शोधनिबंध सादर करीत आहे.

शोधनिबंधाचा उद्देश :—

1. जनगणनेच्या आधारे पुरुष स्त्रियांचे प्रमाण विचारात घेणे.
2. त्यातील बदलत्या आकडेवारीचे विश्लेषण करणे.
3. स्त्री पुरुष आरोग्य विषमता तपासून पहाणे.

4. स्त्री पुरुष शिक्षणातील विषमता विचारात घेणे.
5. स्त्री पुरुष प्रमाणातील असमतोलाची कारणे, परिणाम व प्रथा यांचा विचार करणे.
6. स्त्री भ्रुणहत्या रोखण्याचे व असमानता कमी करण्याचे उपाय शोधणे.
7. कायदेशीर तरतुदीचा आढावा घेणे.

भारतीय जनगणना व स्त्री पुरुष प्रमाण :–

भारतीय समाजातीय स्त्रियांची संख्या पुरुषांच्या तुलनेत कमी होत चालली आहे. जनगणनेच्या पुढील आकडेवारीवरुन गेल्या शतकात स्त्री पुरुष प्रमाणात झालेला बदल दिसून येतो.

तक्ता क्र. 1

| जनगणनेचे वर्ष | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|
| 1901 | 972 |
| 1911 | 964 |
| 1921 | 955 |
| 1931 | 950 |
| 1941 | 945 |
| 1951 | 946 |
| 1961 | 941 |
| 1971 | 930 |
| 1981 | 934 |
| 1991 | 927 |
| 2001 | 933 |
| 2011 | 940 |

स्त्रोत – Economics Survey 2012-13

वरील आकडेवारीनुसार गेल्या 100 वर्षामध्ये भारतातील स्त्री पुरुषांच्या संख्येत स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे. मात्र 2001 व 2011 च्या आकडेवारीनुसार यात थोडी वाढ होतांना दिसत असली तरी ती फारशी समाधानकारक नाही. डॉ. अमर्त्य सेन यांनी भारताच्या स्त्री पुरुष प्रमाणाच्या संदर्भात एक वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक आकृतीबंध समोर आणला आहे. भारतात एकीकडे पंजाब, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र, उत्तर आणि पश्चिमेकडील राज्यांमध्ये हे जन्मजात प्रमाण अखिल भारतीय प्रमाणपेक्षा (94.8) फार मोठ्या प्रमाणात खाली दिसते. तर दुसऱ्या बाजूला केरळ, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल आणि आसाम यासारख्या पूर्व आणि दक्षिणेकडील राज्यात हे अखिल भारतीय प्रमाणापेक्षा अधिक दिसते. ओरिसा, कर्नाटक आणि ईशान्येकडील राज्यातही ते अधिक आढळते. त्यामुळे अखिल भारतीय प्रताणचे आकडे हे अनेक राज्यातील सरासरींपेक्षा अत्यंत खालचे प्रमाण लपवितांना दिसतात.

डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, वैद्यकीय सुविधा आणि तंत्रज्ञानाची उपलब्धता ही कारणक यासाठी योग्य व संयुक्तिक ठरु शकत नाही त्याची काही विश्लेषण पुढीलप्रमाणे दिसतात.

1. जवळजवळ समान वैद्यकीय सुविधा असलेल्या केरळ आणि पश्चिम बंगाल व मध्यप्रदेश आणि राजस्थानमधील या प्रमाणात खूप मोठी तफावत आढळते.
2. आर्थिक आधारही यासाठी खूप महत्वाचा दिसत नाही याचे कारण पंजाब व हरियाणा सारखी गरीब राज्येही या स्त्री विरोधी गटात येतात.
3. जलद विकास साधणाऱ्या गुजरात आणि महाराष्ट्र या सारख्या राज्याबरोबरच बिहार, उत्तरप्रदेश सारखी कमी विकासाची गती असणारी राज्येही यामध्ये येतात.

Research Hub International Journal

4. सर्वच राज्यांमध्ये शहरी भागात ग्रामीण भागापेक्षा मुलीच्या जन्माचे प्रमाण कमी असलेले आढळते.

काही वैशिष्ट्यपूर्ण राज्यांमधील स्त्री पुरुष प्रमाण आकडेवारी पुढीलप्रमाणे दिसून येते.

1. प्रगतीशील व पुरोगामी विचारांचे महाराष्ट्र राज्य :–

| वर्ष | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|
| 1991 | 934 |
| 2001 | 922 |
| 2011 | 929 |

2. शंभर टक्के साक्षरता असणारे केरळ राज्य :–

| | |
|---|---|
| 1991 | 1036 |
| 2001 | 1058 |
| 2011 | 1084 |

3. तामिळनाडू मध्ये 2001 व 2011 मध्ये स्त्रीयांचे प्रमाण सारखेच आहे. 2001 मध्ये 996 व 2011 मध्येही 996 आहे.
4. सगळ्यात कमी अनुपात असणारे राज्य हरियाणा येथे 2011 मध्ये 879 स्त्रियांचे प्रमाण होय.

स्त्री भृणहत्या व स्त्रियांचा घटता दर :–

स्त्री पुरुष प्रमाणातील विषमता ही फक्त मृत्यूदरातूनच नाही तर स्त्री गर्भाच्या गर्भपातापासूनच दिसून येते. 1970 च्या दशकातील 'गर्भजल परीक्षा' हे प्रसुतिपूर्व चाचणी तंत्र भारतात दाखल झाले व 1972 मध्ये गर्भपाताचा कायदा संमत झाला आणि त्यानंतर प्रसुतिपूर्व तपासणीत क्रांती घडवून आणणारे Ultra Sound Sonography हे नवीन तंत्र वैद्यकीय क्षेत्रात आले ह्या आधुनिक साधनाद्वारे व तंत्रज्ञानाच्या आधारे गर्भपात करणे सहज शक्य आणि सोपे झाले. या तंत्रज्ञानाधिष्ठित लिगंवादाने जन्मजात स्त्री पुरुष प्रमाण बदलून टाकले हे पुढील तक्त्यावरुन हदसून येते.

तक्ता क्र.

भारतातील 0 ते 6 वर्षाखालील 1000 मुलांमागील मुलींचे प्रमाण

| वर्ष | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|
| 1961 | 976 |
| 1971 | 964 |
| 1981 | 962 |
| 1991 | 945 |
| 2001 | 927 |
| 2011 | 914 |

निसर्ग नियमानुसार हे लिंग गुणोत्तर 940 च्या आसपास असावयास हवे पण 2001 नंतर हे प्रमाण कमी झाल्याचे आढळते. काही राज्यांमध्ये तर हे गुणोत्तर 900 च्या खाली गेले आहे. जसे–पंजाब (875), हरियाणा (879) इत्यादी.

स्त्रियोचे घटते प्रमाण हे प्रामुख्याने स्त्री गर्भपात आणि सामाजिक मानसितेतील जन्मजात विषमतेमुळे असल्याचे आढळते. याचा अर्थ आजही देशात स्त्रिला जगण्यासाठी अस्तित्वासाइी संघर्ष करावा लागतो आहे. जगण्याचा मूलभूत अधिकारही त्यांना नाकारला जात आहे. आणि अशाही परिस्थितोत मुलगी जन्मली तर पुढे तिची हेळसांड, कुपोषण, आरोग्य, शिक्षण, सुरक्षितता,

Research Hub International Journal

घटनेने दिलेले समानाधिकार या सारख्या अनेक बाबीकडे दुर्लक्षच होतांना दिसते आणि यातुनच जन्मापूर्वीपासूनच जीवन जगण्यामधील स्त्रियाची असुरक्षितता ही एक गांभीर्याची बाब ठरली आहे. स्त्रियांच्या असुरक्षिततेबाबत एका आंतरराष्ट्रोय सर्वक्षणात असे आढळले की या बाबतीत पहिल्या क्रमांकावर अफगाणिस्तान आहे, तर भारताचा चौथा क्रमांक आहे आणि विशेष म्हणजे भारतात स्त्रीची गर्भातच हत्या होणे हे स्त्रियांच्या असुरक्षिततेचे प्रमुख कारण नोंदविण्यात आले आहे.

भारताच्या तुलनेत इतर काही देशातील दर हजारी पुरुषांमागील लिंगानुपात खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| भारत | 940 |
| रूस | 1167 |
| अमेरिका | 1025 |
| ब्राजील | 1042 |
| जपान | 1055 |

स्त्री पुरूष आरोग्य विषयक :—

मानव विकास निर्देशांकात भारताचा क्रमांक नेहमीच खालचा असतो पण त्यामध्येही लिंगात्मक विकास निर्देशांक हा आणखीच कमी असणे ही स्त्री विषयक समस्यांची फार मोठी सुरूवात आहे. महिला सक्षमीकरणबाबत जगातल्या 128 देशात भारताचा क्रमांक 115 वा आहे व ही बाब चिंताजनक आहे. स्त्रियांना मिळणाऱ्या आरोग्य विषयक सुविधांमध्ये देखील फार मोठी विषमता असल्याने स्त्रियांमध्ये पोषक आहाराची कमतरता दिसून येते आणि त्याचा परिणाम म्हणजे स्त्रियांमधील वाढते कुपोषण होय. डॉ. अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील बालमृत्यू मूल्यमापन समितीच्या 2003 च्या आकडेवारीनुसार 10.4 टक्के बालमृत्यू हे कुपोषणामुळे होतात आणि विशेष म्हणजे एकूण बालमृत्यू असतात.[1]

देशातील ग्रमीण मुलांच्या तुलनेत 52 टक्के ग्रामीण मुली आजही कुपोषण ग्रस्त आहेत. भारतात आजही 54 टक्के मुलींमध्ये रक्ताची कमतरता आहे. एका उपलब्ध आकडेवारीनुसार गर्भ मुलाचा असल्यास माता 90 टक्के पोषण प्राप्त करतात. तर मुलीच्या बाबतीत हे प्रमाण फक्त 72 टक्के आहे. परिणामतः गर्भावस्थेतील समस्यांमुळे भारतात प्रत्येक वर्षी जवळपास 56 हजार महिलांचा मृत्यू होतो. या समस्येवर उपाय म्हणून तसेच स्त्रियांना निरोगी स्वास्थ प्राप्त व्हावे म्हणून जननी सुरक्षा योजना 2005—06 पासून शासनाद्वारे सुरू करण्यात आली.

- या योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जातीतील व अनुसूचित जमातीतील मातांना प्रत्यक्ष आरेग्य सेवा व आर्थिक मदत पुरविली जाते.
- जननी सुरक्षा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे माता मृत्यूदर कमी होण्यास व माता स्वास्थ्य सुधारात नक्कीच यश मिळाल्यास पुढील तक्त्यात दिसते.

| वर्ष | मातामृत्यू दर |
|---|---|
| 2002—03 | 1000:301 |
| 2004—06 | 1000:254 |
| 2007—09 | 1000:212 |

तसेच एकूण प्रजनन दर 2005 मध्ये 2.9 होता तो 2011 मध्ये 2.4 पर्यंत कमी झाला.

- 2008—09 मध्ये या योजनेचे 90.37 लाख महिला लाभार्थी होत्या त्यांची संख्या वाढून 2010—11 मध्ये 106.96 लाख झाली आहे.

[1] संदर्भ — आर्थिक जगत खंड 2 पेज 171 डॉ. दि. व्य. जहागिरदार प्रकाशक सेन्टर फॉर इकॉनॉमिक ॲंड सोशल स्टडीज, अमरावती वर्ष 2007.

या सोबतच 2015 पासून केन्द्र शासनाने गर्भवती स्त्रिया व स्तनदा मातांसाठी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना नुकतीच सुरू केलेली आहे.

स्त्री शिक्षणातील विषमता :–

संविधानामध्ये शिक्षणाचा मौलिक अधिकार आपल्याला प्रदान केला व 12 वी पर्यंतचे शिक्षण मुलींना विनामूल्य असण्याची त्यामध्ये तरतूद केली असूनही स्त्री पुरूष साक्षरतेचे प्रमाण कमीच आहे.

तक्ता क्र. 3

भारतातील स्त्री पुरूष साक्षरतेचे विवरण

| वर्ष | एकूण साक्षर लोकसंख्या | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| 1951 | 18.33 | 27.16 | 8.86 |
| 1661 | 28.30 | 40.40 | 15.34 |
| 1971 | 34.95 | 45.95 | 21.97 |
| 1981 | 43.63 | 56.37 | 29.75 |
| 1991 | 52.51 | 63.86 | 39.42 |
| 2001 | 64.83 | 75.26 | 53.67 |
| 2011 | 74.09 | 68.91 | 58.75 |

ज्या क्षेत्रात व्यक्तींच्या सर्व क्षमतांची कसोटी लागते व त्याला स्वतःच्या सुप्त सामर्थ्याची ओळख पटते अशा प्रकारचे अर्थार्जनाचे काम स्त्रियांच्या हाती येण्यासाठी स्त्रियांचे शिक्षण व त्यांचा सामाजिक कार्यातील सहभाग वाढला पाहिजे. भविष्याला आकार देण्यासाठी क्रियाशील सहभाग शिक्षणातून प्राप्त होतो व त्या दृष्टीन स्त्री शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. डॉ. स्वाती कर्वे यांच्या मते तर, स्पर्धायुगात टिकून राहण्यासाठी स्त्रियांना स्वतःची क्षमता वाढविण्याची गरज आहे. पण त्याचबरोबर व्यक्तिगत कौटुंबिक जीवनात परस्पर सहकार्य व समतोल राखण्याची देखील फार गरज आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने नवीन प्रगल्भ सामंजस्य प्रस्थापित होईल.[2]

या परिणामाबाबत स्वामी विवेकानंदानी ठामपणे सांगितले आहे की, **“It is only in the hands of educated and pious women (mother) the great man are born”**[3] अलीकडे शासन सर्व शिक्षा अभियानासारखे कार्यक्रम राबवित असून स्त्री शिक्षणात गुणात्मक व संख्यात्मक वाढ होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

स्त्री पुरूष प्रमाणतील असमतोलाची कारणे –

स्त्रियांबाबतचे वास्तविक चित्रण पाहिले तर स्त्री ही पुरूषांच्या पूर्ण व्यक्तिमत्वाच्या विकासाकडे लक्ष देऊन त्याला यशस्वी जीवन जगण्यासाठी समर्थ बनविते, त्याची काळजी घेते, ज्ञान देते, संस्कृती जतन करण्यास शिकविते, आपल्या कल्पकतेप्रमाणे त्याच्सा चारित्र्याला वळण देते, त्याला प्रात्साहन व पाठिंबा देऊन त्याच्या व्यक्तिमत्वात विविध रंग भरते, त्याचा भार ती आपल्यावर आनंदाने स्विकारते, मानसि ताणतणाव, भयाप्रद गोष्टी व अनिष्ट गोष्टींपासून त्याला दूर ठेऊन सर्वावर प्रेम करायला शिकवते. सामाजिक चित्रण–नागरिकरणाच्या वाढीबरोबर सामाजिक बदलांचा परिणाम होऊन लिंगभेदानुसार स्त्री आणि पुरूषांचे श्रम विभाजन केले गेले. यामध्ये शारिरीक व मानसिक क्षमतेकडे दुर्लक्ष केल्या गेले. वास्तविक स्त्री पुरूषांपेक्षा जास्त खंबीर आहे. ती मनाने व हृदयाने हळवी असली तरी नैसर्गिक प्रसुती काळातील वेदना ती आनंदाने सहन करते म्हणजेच ती कणखर आहे. पण याकडे कामाची मात्र दुलक्ष केले जाऊन तिला दुर्बल ठरविले गेले. यातून कामाची वर्गवारी केली जाऊन घरातील कामकाज **(Private**

---

[2] कर्वे स्वाती, स्त्री विकासाचे नवीन क्षितीज पेज नं. 51, प्रतिमा प्रकाशन, पुणे (2008)

[3] M. Jayalaxsmi] women studies page 14

Domain) महिलेने सांभाळावे आणि बाहेरचे उत्पादक कार्य (Public Domain) पुरूषांशी संबंधीत आहे. असे ठरविल्या गेले परंतु आता उत्पादक आर्थिक कार्य ही महिलांसाठी खुली झाल्याने घरात गृहिणी म्हणून तर बाहेर उत्पादक घटक म्हणून अशी दुहेरी भुमिका पार पाडावी लागत असल्याने तिच्या वरील दडपण अधिकच वाढल्या गेले आहे.

एकदरित स्त्रियांचा कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील सहभाग महत्वपूर्ण असून देखील आपल्या देशात मुलीचा जन्म टाकण्याकडे लोकांची प्रवृत्ती आहे. व म्हणुन स्त्री पुरुष प्रमाणात असमतोल निर्माण झाला आहे. त्याची सर्वसामान्य कारण पुढीलप्रमाणे आहे.

- मुलगा म्हणजे वंशाचा दिवा
- मुलगी म्हणजे परक्याचे धन
- हुंडा पध्दती
- घराण्याच्या प्रतिष्ठेचा विचार
- मुलगा म्हातारपणाचा आधार
- मुलीच्या लग्नासंबंधीच्या अडचणी
- मुलीच्या वर्तनाबाबत जननिंदेची भिती

यासारख्या कारणांमुळे मुलगी शक्यतो जन्मालाच येऊ नये यादृष्टीने प्रयत्न केले जातात व त्यातुन भारतीय समाजात काही दुष्ट व अनिष्ट प्रथा रूढ होत गेल्याचे दिसते. जसे–बालिका हत्या, स्त्री अपत्याकडे जाणीवपर्वक दूर्लक्ष, मुलगा व मुलगी याच्यांत दुजाभाव, स्त्री भृणहत्या, शरीरशास्त्रामधील वैद्यकीय प्रगती व अत्याधुनिक यंत्रे व यातून घडवून आणले जाणारे गर्भपात इत्यादी. या सारख्या घटनांमध्ये शिक्षित–अशिक्षित, श्रीमंत–गरीब, ग्रामीण–शहरी या सर्वाचाच सहभाग आहे. याचा अंतिमतः परिणाम म्हणजे स्त्रियांचे प्रमाण कमी होऊन स्त्री पुरुष अनुपातात असमानता वाढत गेली आता तर तो धोक्याची घंटा म्हणुन फार मोठी समस्या झाली आहे.

स्त्री असमानता परिणाम :–

स्त्रियांची संख्या कमी झाल्याने त्याचे काही दुष्परिणाम जाणवू लागले आहेत.

1) बहूपती विवाह
2) उपवर वधुची विक्री
3) बलात्कार, अपहरण
4) बालविवाह
5) मुलीचे दुर जाणे
6) आत्मविश्वासाची कमतरता
7) लोकसंख्येत असंतुलन
8) एड्स व असाध्य गुप्त रोग्यांच्या संख्येत वाढ व त्याचा प्रसार
9) गुणी मुलींची हत्या
10) स्त्री यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम
11) असुरक्षिततेच्या भावनेत वाढ

स्त्री भृत्यहत्या रोखण्याबाबत कायदेशीर तरतुदी :–

1970 च्या दशकात गर्भजल परिक्षा हे प्रसुतिपूर्व चाचणी तंत्र भारतात दाखल झाले व 1971 मध्ये गर्भपाताचा कायदा (MTP Act 1971) संमत झाला परिणामतः मुलीचा गर्भ असल्यास तो कायदेशीर पध्दतीने गर्भपात करुन काढुन टाकण्याला सर्रास सुरवात झाली. तेव्हा 1976 साली भारत सरकारने या चाचण्यांवर बंदी आणली. 1988 मध्ये महाराष्ट्रात पाहिल्यांदा या बंदीला कायद्याचे स्वरुप मिळाले आणि त्यानंतर इतर राज्यानी कायदे केले. Ultra sound sonography च्या क्रांतीकारक बदलाचा तर फार मोठा दुरूपयोग होऊन स्त्री पुरूष लिंग गुणोत्तर प्रमाण आणखीच बिघडत गेले. तेव्हा 1994 मध्ये pre-natal Diagnostic Techniques Act (PNDT Act) लागू करण्यात आला. पण या कायद्याची अंमलबजावणी मात्र फारशी प्रभावीपणे झाली नाही आणि त्यामुळे 2001 च्या जनगणनेतील लिंग गुणोत्तराचे आकडे बघितल्यानंतर सरकारचे धाबे दणावले. परिणामी 2002 मध्ये PC & PCDT Act 2002 (The pre conception & pre-Natal Diagnostic Techniques (prohibition of sex selection) Act 2002 हा आणखी कडक करण्यात आला व यामध्ये

पेशंटबरोबरच डॉक्टरांसाठी देखील दंड व शिक्षेची तरतूद करण्यात आली. केन्द्रिय स्वास्थ मंत्रालयाने लोकसंख्या संशोधन विभागाला काही प्रकल्प दिलेत व त्यातून यासंबंधी माहिती गोळा केली. तर दुसरीकडे काही स्वयंसेवी संस्थांनी sting operation करून या कायद्याच्या अंमलबजावणीला चांगला सहयोग दिला आणि त्याचा परिणाम 2011 च्या जनगणनेत पंजाबच्या लिंग गुणोत्तरात 48 अंकानी वाढ झालेली आहे. तर हरियाणा, गुजरात प्रदेशाच्या गुणोत्तरात 10 पेक्षा कमी अंकाची वाढ झालेल्याचे आढळले. या गुणोत्तरात आणखी वाढ होण्यासाठी स्त्री विकास योजनांची व त्या बाबतच्या मानसिकतेची गरज आहे.

या संदर्भात डॉ. अमर्त्य सेन यांनी स्त्रियांच्या विकासाबाबतची मांडलेली मते विचारात घेण्यासारखी आहेत. त्यांच्या मते स्त्रिया हया समाजाचा अर्धा हिस्सा आहे. आणि स्त्री विकास हा समाजाच्या विकासाचा मुख्य मार्ग आहे. तेव्हा स्त्रियांचा विकास होण्यासाठी स्त्री शिक्षणावर भर देणे, स्त्रियांना अर्थार्जनाचे साधन प्राप्त होणे आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचे स्थान असणे हे महत्वाचे आहे पण याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक पैलूचाही विचार करणे अधिक गरजेच आहे.

पण या सर्वात महत्वाचे म्हणजे स्त्रियांनी ‘स्वसंरक्षणाचा’ अवलंब करुन स्वतःच्या जीवनाबाबत निर्णय घेण्याचे, आत्मसन्मान राखण्याचे व त्याआधारे आपल्या महिलांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न स्वतःपासूनच सुरु केले पाहिजेत. तेव्हाच संतुलित सामाजिक संरचना अस्तित्वात येऊन अर्थपूर्ण राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास घडून येणे शक्य होईल व ही बाब आता जागतिक पातळीवर सुध्दा मान्य झाल्याचे दिसून यते.

संदर्भ :–


- **Economic Survey Analysis 2014-15 Government of India, Ministry of Finance**
- डॉ. दि. व्य. जहागिरदार – आर्थिक जगत खंड 2, सेन्टर फॉर इकॉनॉमिक अँड सोशल स्टडीज, अमरावती (2007)
- **M. Jayalaxsmi, P. Rajan, S.Bama – Women Studies, Himalaya Publishing House 2010,**
- **Female Foeticide : Beyond the Horizon Of Human Right Conference Proceedings, March 2014**
- कर्वे स्वाती, स्त्री विकासाचे नवीन क्षितीज प्रतिभा प्रकाशन, पुणे (2002)
- **www.censusreport2001&11**
- लोकमत,महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता 11 जुलै 2015


Research Hub International Journal